CMYK
www.surajyadigital.com

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

। रविवार, दि. ३० जून २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २७१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२




टीम इंडियाची स्वप्नपूर्ती!

# रोहित सेना जगज्जेता

**बार्बाडोस :** सूर्यकुमार यादवने अखेरच्या षटकात पकडलेल्या डेव्हिड मिलरच्या झेलच्या जोरावर भारताने टी वर्ल्ड कप जिंकला.

मिलर हा भारताच्या विजयातील मोठा अडसर होता. पण हार्दिकच्या गोलंदाजीवर तो बाद झाला आणि भारताच्या बाजूने सामना झुकला. भारताने यावेळी १३ वर्षांच्या दुष्काळ संपवला. कारण भारताने यापूर्वी वर्ल्ड कप २०११ साली जिंकला होता. विराट कोहलीच्या अर्धशतकाच्या जोरावर भारताने १७६ धावांपर्यंत मजल मारली होती. भारताने गोलंदाजीची दमदार सुरुवात करत दक्षिण आफ्रिकेची २ बाद १२ अशी अवस्था केली होती. पण त्यानंतर दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी दमदार फलंदाजी करत विजयाच्या आशा पल्लवित केल्या. पण अखेरच्या षटकात जेव्हा मिलर बाद झाला त्यानंतर भारताने ७ धावांनी हा सामना जिंकला.

बुमराहने आपल्या पहिल्याच षटकात भारताला यश मिळवून दिले. बुमराहने यावेळी सलामीवीरी रीझा हेनड्रीक्सला चार धावांवर बाद केले. त्यानंतर अर्शदीप सिंग यावेळी भारताच्या मदतीला धावून आला आणि त्याने संघाला मोठे यश मिळवून दिले. कारण अर्शदीपने यावेळी दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्करमला चार धावांवर बाद केले. त्यामुळे भारताने दक्षिण आफ्रिकेची २ बाद १२ अशी अवस्था केली होती. त्यावेळी भारताला दक्षिण आफ्रिकेला बॅकफूटवर ढकलता आले असते, पण तसे घडले नाही.

दक्षिण आफ्रिकेच्या संघाला यावेळी सावरले ते क्विंटन डीकॉकने. कारण डीकॉकने यावेळी स्ट्रीस्टन स्टब्सच्या साथीने संघाचा डाव सावरला. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ५८ धावांची भागीदारी रचली. पण त्योळी अक्षर पटेलने ही जोडी फोडली. अक्षरने स्टब्सला बाद केले, त्याला २१ चेंडूत ३१ धावा करता आल्या. त्यानंतर डीकॉक यावेळी भारताच्या विजयाच्या मार्गात अडसर बनत होता. पण पुन्हा एकदा अर्शदीप भारताच्या मदतीला आला. कारण अर्शदीपने डीकॉकला आपल्या जाळ्यात फासले. डीकॉकने यावेळी ३१ चेंडूत ३९ धावांची खेळी साकारली. भारताच्या विजयाच्या मार्गात आता हेन्रीच क्लासिन आणि डेव्हिड मिलर हे दोन फलंदाज होते. त्यामुळे दोघांना बाद करण्याची रणनिती रोहित शर्मा आखत होता. पण डेव्हिड मिलरने कुलदीप यादवच्या गोलंदाजीवर जोरदार हल्ला चढवला होता आणि क्लासिन त्याला चांगली साथ देत होता. क्लासिन २७ चेंडूत ५२ धाव काढून बाद झाला आणि भारताला हायसे वाटले. पण त्यावेळी डेव्हिड मिलर भारतचा

विराट कोहलीच्या अर्धशतकाच्या जोरावर भारताला प्रथम फलंदाजी करताना १७६ धावा करता आल्या. कोहलीने यावेळी ५९ चेंडूत सहा चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ७६ धावांची खेळी साकारली. भारताच्या या धावसंख्येमध्ये मोलाचा वाटा होता तो अक्षर पटेलचा. अक्षरने १ चौकार आणि चार षटाकारांच्या जोरावर ३१ चेंडूत ४७ धावांची खेळी साकारली.



सीमा रेषेवर सूर्यकुमार यादवने झेल पकडल्यानंतर सामना भारताच्या बाजूने झुकला.

## सोलापुरात जल्लोष

बार्बाडोस मैदानावरील रोमहर्षक लढतीत रोहित सेनेने विश्वचषक जिंकल्यानंतर सोलापुरातील जल्लोष सुरू झाला. सामन्याच्या मध्यत्तंरीच्या काळात दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी फटकेबाजी करून सामना आपल्याकडे झुकला होता. त्यावेळी क्रिकेटप्रेमी तणावाखाली आले होते. मात्र ३० चेंडू ३० धावांची गरज असताना भारतीय खेळाडूंनी शांत माथा ठेवून फिंल्डींग लावली. आणि गोलंदाजांनी आफ्रिकन संघांची मधलीफळी मोडून काढली. आणि सामना भारताकडे झुकला. त्यानंतर क्रिकेटप्रेमींनी फटाके फोडण्याची तयारी केली. विश्वचषक जिंकल्यानंतर शहरात फटाक्यांचा दणदणाट सुरू झाला.

# डॉक्टर हल्ल्याप्रकरणी एमआयएमचा नेता जहागीरदार ११ वर्षांनंतर जेलबाहेर

- माजी नगरसेवक गाझींच्या गुन्ह्याचा ११ वर्षांनंतर निकाल
- प्रेमात अडसर ठरणाऱ्या फारूक महागामींवर केला होता हल्ला

**सोलापूर/प्रतिनिधी**

**प्रेमात अडसर ठरणाऱ्या फारूक नजीर महागामी या डॉक्टरवर प्राणघातक हल्ला करण्याच्या प्रकरणातून संशयित आरोपी एमआयएम पक्षाचे नेते तथा माजी नगरसेवक गाझी जहागीरदार यांची सबळ पुराव्याअभावी तब्बल ११ वर्षांनंतर निर्दोष मुक्तता झाली आहे. जिल्हा व सत्र न्यायलामधील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती आर. के. जंगम यांनी जहागीरदार यांची निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश दिले.**

या प्रकरणाची थोडक्यात हाकिकत अशी की, दिनांक ७ नोव्हेंबर २०१३ रोजी फिर्यादी डॉक्टर फारूक नजीर महागामी (रा. सोलापूर) हे त्यांचा बसवनगर येथील दवाखाना बंद करून विजापूर रस्त्यावरुन सोलापूरच्या दिशेने येत असताना रात्री १०:४५ वाजण्याच्या सुमारास देशमुख वस्तीजवळ आले असताना पाठीमागून एका दुचाकी मोटरसायकलवर माजी नगरसेवक गाझी जहागीरदार व इतर दोघे यांनी फिर्यादीला अडवून त्यास तू माझ्या प्रेम प्रकरणांमध्ये का येतो? असा जाब विचारत हातातील ऊस तोडण्याच्या कोयत्याने फिर्यादीच्या डोक्यात वार करून त्यास गंभीर जखमी करून त्यांना बाजूस असलेल्या झुडपामध्ये फेकून निघून गेले होते, असा गाझी जहागीरदार यांच्यासह त्यांच्यासोबतच्या दोघांवर आरोप होता.

तद्नंतर फिर्यादी यांनी मोबाईल वरून ही घटना त्यांचे बंधूंना कळवली. शिवाय उपचाराकरिता दवाखान्यांमध्ये जाऊन त्यानंतर मंद्रूप पोलीस स्टेशन येथे माजी नगरसेवक गाजी जागीरदार यांच्या विरुद्ध व त्यांच्या २ साथीदारांच्या विरुद्ध फिर्याद दिली होती. फिर्यादाच्या अनुषंगाने, जहागीरदार यांच्यासह दोघांवर गुन्हा दाखल झाला होता, या गुन्ह्याचा तपास करून पोलिसांनी सोलापूर येथील न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. दरम्यान खटल्याची सुनावणी सोलापूर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती आर. के. जंगम यांच्या कोर्टामध्ये झाली.

सदर खटल्यामध्ये आरोपी माजी नगरसेवक गाझी जहागीरदार यांच्या तर्फे ॲड रियाज एन. शेख यांनी तर सरकार पक्षा तर्फे ॲड माधुरी पाटील यांनी काम पाहिले.



एमआयएम नेता डॉक्टर फारूक नजीर महागामी

## प्रेम असल्याचं कोर्टात सिद्ध नाही करता आलं

प्रस्तुत खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे फिर्यादी, पंच, फिर्यादीला जखमीला तपासणारे डॉक्टर, तपासी अधिकारी असे एकूण ५ साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले होते.या खटल्याच्या अंतिम युक्तीवादावेळी आरोपी माजी नगरसेवक गाझी जहागीरदार यांच्यावतीने युक्तिवाद करत असताना ॲड. रियाज शेख यांनी आरोपी विरुद्ध खोटी केस केलेली आहे, कोणताही नेत्र साक्षीदार मिळून आलेला नाही, तपासामध्ये घटनास्थळ पंचनामांमध्ये व फिर्यादी जबाब मध्ये तफावत आहे, फिर्याद उशिराने दाखल झालेली आहे, आरोपीचे प्रेम संबंध असल्याचे सबळ पुरावे निर्माण कोर्टामध्ये सादर करण्यात आलेले नाही,असा युक्तवाद केला.

## नेत्रसाक्षीदार नव्हते; घटनेबाबत संशय

साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीमध्ये दिलेला जबाब हा विसंगती निर्माण करतो व घटना घडल्या बाबत संशय निर्माण करणारा आहे, घडलेल्या घटनेबाबत स्पष्ट पुरावा आरोपीनेच मारल्याचे दिसून येत नसल्याने आरोपीस निर्दोष मुक्तता करावी असा युक्तिवाद केला. हा युक्तिवाद ग्राह्य धरून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती आर. के. जंगम यांनी माजी नगरसेवक गाझी जहागीरदार यांना सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश दिले.

# कांदा घेऊन फसवणूक

## गोरडवाडी येथील व्यापारावर गुन्हा

**सोलापूर :** उसनवारीवर कांदा घेऊन पैसे न देता ६ शेतकऱ्यांना ३ लाख ४४ हजार रुपयाची फसवणूक केल्याची घटना माळशिरस तालुका परिसरात नुकतीच उघडकीस आली .या प्रकरणात माळशिरसच्या पोलिसांनी गोरडवाडी (ता. माळशिरस) येथील महाकु धुळा यमगर या व्यापाऱ्या विरुद्ध नुकताच फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून तो सद्या फरार आहे.

यासंदर्भात संजय पिराजी खंदारे (रा.मेडद ता.माळशिरस) या शेतकऱ्याने पोलिसात फिर्याद दाखल केली. महाकु यमगर या व्यापाऱ्याने खंदारे आणि त्यांच्या परिचयातील ४ ते ५ शेतकऱ्याकडून ९ मे ते जून या कालावधीत ३ लाख ४४ हजार रुपयांचा कांदा उसनवारीवर घेतला होता. त्याची विक्री करून देखिल त्याने पैसे दिले नाही. फसवणूक झाल्याचे उघडकिस आल्यानंतर खंदारे यांनी पोलीसात तक्रार दाखल केली. हवालदार बोंद्रे हे पुढील तपास करीत आहेत.

# महापालिका पोषण पुनर्वसन केंद्र सुरू करणार

- अहिल्यादेवी होळकर प्रसूतीगृह येथे प्रकल्पाचे काम सुरू
- जुलै अखेर सेवेत रूजू होणार

**सोलापूर/प्रतिनिधी**

शहरात डफरीन चौक येथील महापालिकेच्या राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रसूतीगृह परिसरात कुपोषित माता व बालकांसाठी पोषण पुनर्वसन केंद्र (न्यूट्रिशन रिहॅबिलीटेशन सेंटर - एनआरसी) सुरू करण्यात येणार आहे. येत्या जुलै अखेरपर्यंत या प्रकल्पाचे काम पूर्ण होणार आहे.

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत शहरात पोषण पुनर्वसन केंद्र मंजूर झाले आहे.



महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार हे केंद्र उभारण्याचे काम डफरीन चौक येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रसुती गृह परिसरातील आरोग्य अधिकारी निवासस्थानाच्या ठिकाणी या प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले आहे.



पोषण पुनर्वसन केंद्र हे आरोग्य सुविधेतील एक युनिट आहे जेथे गंभीर तीव्र कुपोषण असलेल्या मुलांना दाखल केले जाते आणि त्यांचे व्यवस्थापन केले जाते. मुलांना परिभाषित प्रवेश निकषांनुसार प्रवेश दिला जातो आणि त्यांना वैद्यकीय आणि पौष्टिक उपचारात्मक काळजी प्रदान केली जाते. दहा दिवस मुलांना या केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निरीक्षणाखाली ठेवण्यात येईल. या दहा दिवसात वेळेवर पुरेसे आणि योग्य आहार देण्यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. दहा माता - बालकांसाठी या केंद्रात व्यवस्था सज्ज ठेवण्यात येणार आहे, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

## सहा ठिकाणी आपला दवाखाना सुरू करणार

सोलापूर शहरात यापूर्वी एकूण आठ हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने सुरू करण्यात आले आहेत. यानंतर विविध ठिकाणी सहा आपला दवाखाना सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठीची कार्यवाही सुरू आहे. लवकरच शहरवासीयांना या ठिकाणी वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार आहे.

> “सोलापूर महापालिकेचे आठ प्रसूती ग्रह आणि इतर आरोग्य केंद्र आहेत. या आरोग्य विभागामध्ये मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे महापालिकेच्या वतीने नेटक्या पद्धतीने वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यासाठी सोलापुरातील डॉ. वैशंपायन स्मृति शासकीय महाविद्यालयातील तिसरे वर्ष पास झालेल्या २० विद्यार्थ्यांची मागणी अधिष्ठातांकडे करण्यात आली आहे. या संदर्भात कार्यवाही होऊन ते विद्यार्थी उपलब्ध होणार आहेत.
>
> **-डॉ. राखी माने**
>
> **अशी माहिती महापालिका आरोग्य अधिकारी**

# राज्यभर ‘पब-बार’वर फिरणार बुलडोझर

## मुख्यमंत्री शिंदे यांनी सोडले फर्मान

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

**पुण्यात आठवडाभरापूर्वी एका हॉटेलमध्ये रंगलेल्या ड्रग्ज पार्टीची चर्चा आजही राजकीय पटलावर रंगते आहे.सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात या क्षणालाही नशापार्टीवरून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहे.विधानसभेतही हे प्रकरण चांगलेच गाजले.या प्रकरणावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी एक महत्वाचे विधान केले. ड्रग्ज प्रकरणांमध्ये कुठल्याही परिस्थितीत कुणालाही पाठीशी घालण्याचे काम होणार नाही.केवळ पुण्यातच नाही तर महाराष्ट्रभर पबवर बुलडोझर फिरणवण्यात येईल,असा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे.त्यामुळे असा व्यवसाय करणाऱ्या हॉटेल चालकांमध्ये खळबळ उडाली आहे.**

पुण्यामध्ये एकीकडे गुन्हेगारी वाढत असताना दुसरीकडे पबमध्ये नशापार्टीचे स्तोम माजत चालले आहे.मागच्या आठवड्यात एका हॉटेलमध्ये पहाटेपर्यंत ड्रग्जची पार्टी रंगली होती.जिथे जागा मिळेल तिथे विशेष करून तरूणींनी ड्रग्जचा मनसोक्तपणे झुरका घेतला. पुणे शहर आणि जिल्ह्यात मागील वर्षभरात हजारो कोटींचा ड्रग्सचा साठा पुणे पोलिसांनी ठिकठिकाणी छापे टाकून जप्त केला आहे.

या पार्टीचा व्हिडिओ व्हायरल होताच पुण्यात एकच खळबळ माजली.पोलिसांनी क्विक ॲक्शन घेवून अनेकांना अटकही केली.त्यानंतर पार्टीचे पब पाडून टाकण्याची मोहीम हाती घेतली गेली.काही महिन्यांपूर्वी ससूनमधील ड्रग्ज प्रकरण राज्यभर गाजले होते. त्यात सोलापूरचेही कनेक्शन होते.

या नशा पार्टीचा सुळसुळाट राज्यभर वाढत चालला आहे.तो खणून काढण्याची गरज आहे. त्या पार्श्वभूमीवर सातत्याने समोर येणाऱ्या ड्रग्ज पार्ट्यांना आळा घालण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी प्रशासनाला कठोर पावले उचलण्याच्या सूचना देत थेट अनधिकृत पब व बार वर बुलडोजर चालवण्याच्या आदेश दिले आहेत. ही बुलडोझर कारवाई संबंध महाराष्ट्रात सुरू करणार असल्याचे विधानही यावेळी शिंदे यांनी केले आहे.


शिंदे हे शनिवारी पुणे दौऱ्यावर होते. माध्यमांशी त्यांच्याशी संवाद साधला.या प्रकरणाकडे लक्ष वेधल्यानंतर शिंदे म्हणाले, पुण्यातील अनधिकृत पब, बार, हॉटेल आणि ड्रग्ज विक्रीची जी कुठली ठिकाणे असतील किंवा शाळा कॉलेजच्या बाजूला ज्या काही टपऱ्या असतील ते सर्व बुलडोझर लावून तोडण्याचे आदेश मी पुणे पोलीस आयुक्तांना दिले आहेत.

प्रशासन त्यामध्ये तत्पर कारवाई करेल. जे अधिकारी कामात दिरंगाई करतील त्यांच्यावर देखील निलंबनाची कारवाई केली जाईल,अशा शब्दात तंबी देवून शिंदे म्हणाले की, महाराष्ट्रात कुठेही ड्रग्जचा व्यापार खपवून घेतला जाणार नाही.

सरकार यावर काम करत आहे, सगळ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. पुण्यामध्ये जी कारवाई सुरू आहे, त्याच प्रकारची कारवाई सगळीकडे करण्यात येईल.

### जादुगारांचे कौतुक कधी

पुणे महानगरपालिकेकडून सध्या अनधिकृत पब्स आणि बारवर कारवाई करण्यात येत आहे. सलग चौथ्या दिवशीसुद्धा ही कारवाई करण्यात आली आहे. आतापर्यंत बाणेर, बालेवाडी, कल्याणीनगर, वडगाव शेरी, शिवाजीनगर, कोरेगाव पार्क इथे पोलिसांकडून कारवाई करण्यात केली गेलीय. आता म राठी अभिनेत्याने पोस्ट केली आहे. सौरभ गोखले याने त्याच्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, शहरातील अनेक ईल-लीगल पब्स आणि बार्सवर महापालिकेची कारवाई!!! पण हे अनधिकृत बार आणि पब बांधू देऊन इतकी वर्ष ज्यांनी मोकाट चालू दिले, त्या जादूगारांचा कौतुक सोहळा कधी?





### पिढी बरबार करत असतील तर...

ड्रग्ज प्रकरणांमध्ये कुठल्याही परिस्थितीत कुणालाही पाठीशी घालण्याचे काम होणार नाही. दोषींवर कठोरातील कठोर कारवाई करण्यात येईल. तरुण पिढी बरबाद करण्याचे काम जे कोणी लोक करत आहेत, त्यामध्ये ड्रग्स विक्रेते, पेडलर किंवा सप्लायर्स असतील त्यांची पाळेमुळे शोधून नष्ट करण्याच्या सूचना आणि आदेश मी दिलेले आहेत,असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### विद्येचे माहेरघर आहे काय?

पुण्यातील गजबजलेल्या एफ सी रोडवरील एल थ्री लाउंज मधील पार्टीत ड्रग्ज पार्टीने मोठी खळबळ उडाली. हडपसरम धील कल्ट नावाच्या पबमधे नशेबाजांनी रात्री साडेबारा वाजेपर्यंत पार्टी केली आणि पुढे पहाटेपर्यंत पार्टी करण्यासाठी ते एफ सी रोडवरील एल थ्री लाउंजमध्ये पोहोचले आणि पार्टी केली. हा प्रकार समोर आल्यानंतर विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्याला आता ड्रग्जमाफियांनी ताब्यात घेतलंय का? असा संतप्त सवाल आता पुणेकर विचारू लागलेयत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कर्ज काढून वीजबिल भरत होतो!

कल्याण

560-15-690

CMYK